अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । रविवार, दि. १५ मार्च २०२६ । ▶ वर्ष : २४ वे ▶ अंक : १६५ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## विवाहितेला उचलून नेत अत्याचार, खांबालाही बांधलं!

✔ **बीड :** तालुक्यातील एका गावामध्ये धक्कादायक आणि संतापजनक घटना घडली असून घरात झोपलेल्या अल्पवायीन विवाहितेला उचलून गावाबाहेर नेत तिच्यावर अत्याचार करण्यात आला. त्यानंतर तिला गावामध्ये आणून गावच्या चावडीवर खांबाला बांधून ठेवले गेले. हा सगळा प्रकार सकाळी समोर आल्यानंतर गावकऱ्यांनी या विवाहितेची सुटका केली. या प्रकरणात पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून

### नराधमाला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपी वैभव पटेकर याला अटक केली. आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १७ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

बीड जिल्ह्याच्या हिवरापाडी येथील अल्पवयीन विवाहितेवर अत्याचाराची धक्कादायक घटना समोर आली आहे. ११ मार्च रोजी आपल्या घरी झोपली असता गावातील वैभव पटेकर याने पीडितेला उचलून नेते नदीकडील परिसरात नेऊन अत्याचार केला. दरम्यान, घरातून नेतानाच पीडितेने विरोध केला असता, तिचे तोंड दाबून तिला जबरदस्तीने नेण्यात आले. अत्याचारानंतर गावातील चावडीवर असलेल्या खांबाला बांधून तो पळून गेला. सकाळी ग्रामस्थांनी पीडितेला खांबाला बांधलेलं पाहिले असता ही घटना उघडकीस आली. ग्रामस्थांनी घटनेचा व्हिडिओ बनवला असून तोही माध्यमांत समोर आला आहे.

# जुळ्या बहिणीची ८४ वार करून निर्घृण हत्या

## अभियंत्याने आईला दिले 'सरप्राईज !'



✔ पुणे/प्रतिनिधी

**एका उच्चशिक्षित इंजिनिअर तरुणाचं सोशल मीडियावरून पुण्यातील एका परधर्मीय तरुणीशी सूत जुळलं. हे प्रेम इतकं टोकाचं होतं की, त्याने आपल्या संपूर्ण कुटुंबालाच संपवण्याचा विदारक खेळ मांडला. प्रेमासाठी सख्ख्या बहिणीचा काटा काढणाऱ्या या तरुणाने आपल्या आईला जे 'सरप्राईज' दिलं, ते पाहून संपूर्ण देश हादरला आहे. आपल्या प्रेमाच्या आड येणाऱ्या प्रत्येकाला संपवण्याच्या इराद्याने त्याने हे क्रूर पाऊल उचललं. उत्तर प्रदेशातील मुरादाबादमध्ये ही थरारक घटना घडली असून, या घटनेचे धागेदोरे थेट पुण्याशी जोडले गेले आहेत.**

### पुण्याच्या तरुणीसाठी बहिणीचा क्रूर शेवट

■ संशयित आरोपी हार्दिक हा पेशाने इंजिनिअर असून गेल्या काही काळापासून तो सोशल मीडियाच्या आहारी गेला होता. याच माध्यमातून त्याची ओळख पुण्यातील एका परधार्मीय तरुणीशी झाली. हार्दिकला त्या तरुणीशी लग्न करायचे होते, मात्र त्याचे कुटुंब आणि विशेषतः त्याची जुळी बहीण हिमाशिखा या लग्नाच्या विरोधात होती. हिमाशिखा स्वतः देखील इंजिनिअर होती आणि भावाने आधी आपल्या करिअरवर लक्ष केंद्रित करावे, अशी तिची भूमिका होती. पुण्याच्या तरुणीशी असलेल्या संबंधांवरून आणि लग्नाच्या हट्टावरून घरात वारंवार खटके उडत होते.

६ मार्च रोजी हा वाद विकोपाला गेला. आपल्या प्रेमकथेमध्ये बहीणच सर्वात मोठा अडथळा ठरत असल्याचा समज हार्दिकने करून घेतला आणि रागाच्या भरात त्याने भाजी कापण्याच्या सुऱ्याने हिमाशिखावर सपासप वार केले. पोस्टमार्टम रिपोर्टमध्ये समोर आलेल्या माहितीनुसार, त्याने बहिणीच्या शरीरावर तब्बल ८४ वार करून तिची निर्घृण हत्या केली.

### आईला दिलं ते भयानक 'सरप्राईज'

बहिणीचा जीव घेतल्यानंतर हार्दिकच्या डोक्यातील रक्ताचं वारं शांत झालं नव्हतं. तो रक्ताने माखलेल्या कपड्यांतच आपल्या आईच्या ऑफिसमध्ये पोहोचला. त्याची आई एका विमा कंपनीत असिस्टंट मॅनेजर म्हणून कार्यरत आहे. तिथे गेल्यावर त्याने अत्यंत शांतपणे आईला सांगितलं, आई, चल घरी... तुझ्यासाठी एक मोठं सरप्राईज आहे. मुलाच्या या बोलण्यावर विश्वास ठेवून आई घरी आली, पण घरात पाऊल ठेवताच समोर मुलीचा छिन्नविछिन्न झालेला मृतदेह पाहून त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यांनी आरडाओरडा सुरू करताच हार्दिकने त्यांच्यावरही हल्ला चढवला. सुदैवाने, या हल्ल्यात त्या वाचल्या असून सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

### सोशल मीडिया आणि टोकाचं पाऊल

पोलीस तपासात हार्दिकने कबूल केलं की, पुण्यातील त्या तरुणीशी लग्न करण्याच्या त्याच्या निर्णयाला घरातून विरोध होत होता. बहीण आणि आई त्याला सतत करिअर सुधारण्याचा आणि या प्रेमसंबंधांपासून दूर राहण्याचा सल्ला देत होत्या. हाच सल्ला त्याला टोचत होता. दीड वर्षांपूर्वी नोकरी सोडल्यानंतर तो पूर्णवेळ मोबाईलमध्येच असायचा. प्रेमात पडलेला हा तरुण इतका हिंसक झाला की, ज्या बहिणीसोबत त्याने २५ वर्षं घालवली, तिचाच त्याने पुण्याच्या तरुणीसाठी बळी दिला.

### पोलिसांनी २४ तासांत आवळल्या मुसक्या

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली आणि अवघ्या २४ तासांच्या आत हार्दिकला बेड्या ठोकल्या. एका उच्चशिक्षित इंजिनिअर तरुणाने केवळ सोशल मीडियावरील ओळखीसाठी आणि लग्नाच्या हट्टासाठी स्वतःचं घर उद्ध्वस्त केल्याने परिसरात संतापाची लाट आहे. सोशल मीडियाचा अतिवापर आणि त्यातून निर्माण होणारी गुन्हेगारी प्रवृत्ती या घटनेमुळे पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे.

## दरवाजा बंद केला... हातपाय बांधले... तोंडात बोळा कोंबला...

✔ बीड/प्रतिनिधी

परळी तालुक्यातील धारावती तांड्यावर एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर झालेल्या पाशवी अत्याचारामुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. ओळखीचा फायदा घेत दोन नराधमांनी पीडितेचे हातपाय बांधून आणि तोंडावर बोळा कोंबून अत्यंत क्रूरपणे अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेनंतर राज्यभरात संतापाची मोठी लाट उसळली असून, परळी ग्रामीण पोलिसांनी पोक्सोसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

(अधिक वृत्त पान ७ वर...)



**अल्पवयीन मुलीवर अत्यंत क्रूरपणे सामुहिक अत्याचार**

### गोडीने बोलावून केला पाशवी अत्याचार

मिळालेल्या माहितीनुसार, धारावती तांड्यावर राहणाऱ्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला दोन नराधमांनी गोडीने घरी बोलावले. त्यानंतर त्यांनी घराचा दरवाजा बंद करून, पीडितेचे हातपाय बांधले आणि तोंडात कपड्याचा बोळा कोंबला. त्यानंतर या नराधमांनी तिच्यावर पाशवी अत्याचार केला. अत्याचारानंतर, कोणाला काही सांगितले तर तुला जीवे मारून टाकीन, अशी धमकी देत त्यांनी पीडितेला सोडून दिले.

### आरोपी फरार, पोलिसांकडून शोध मोहीम सुरू

गुन्हा दाखल होताच पोलिसांचे पथक आरोपींच्या शोधात घटनास्थळी पोहोचले. मात्र, पोलिसांच्या हालचालींची कुणकुण लागताच दोन्ही आरोपी फरार झाले. सध्या अंबाजोगाई उपविभागाचे 'पिंक पथक' आणि सहायक पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांच्या नेतृत्वाखालील टीम आरोपींचा कसून शोध घेत आहे. या धक्कादायक घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून, आरोपींना लवकरात लवकर अटक करून कडक शासन करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## शैक्षणिक संस्थांना १०० टक्के; इतरांना ५० ते ७० टक्के गॅस कोटा

### गॅस पुरवठ्याची नियमावली जाहीर

■ **सरकारव्दारे जिल्हाधिकाऱ्यांना ठरवून दिला वितरणाचा क्रम**

■ **स्वयंपाकाच्या सिलिंडरला प्राधान्य**

✔ मुंबई/प्रतिनिधी



इराण विरुद्ध इस्त्रायल - अमेरिका युद्धामुळे राज्यात स्वयंपाकाच्या गॅसचा भयंकर तुटवडा निर्माण झाला आहे. बुकिंग करूनही गॅस मिळत नसल्यामुळे नागरिकांच्या गॅस एजन्सीपुढे लांबलचक रांगा लागल्या आहेत. यामुळे सरकारने एका परिपत्रकाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना प्राधान्यक्रम क्षेत्र व त्यांना गरजेनुसार किती गॅस पुरवठा करायचा? यासंबंधीचे दिशानिर्देश जारी केलेत. यात काही क्षेत्रांना १०० टक्के, तर काही क्षेत्रांना ७० ते ५० टक्के गॅस पुरवठा करण्याची सूचना करण्यात आली आहे.

सध्याच्या आपत्कालीन परिस्थितीत राज्य सरकारने स्वयंपाकाच्या गॅसच्या पुरवठ्याला प्राधान्य दिले आहे. या प्रकरणी व्यावसायिक गॅसच्या पुरवठ्यावर अंशतः निर्बंध लादण्यात आलेत. परिणामी, गॅसवर अवलंबून असणाऱ्या राज्यातील उद्योग, व्यवसायांना जबर फटका बसला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने एका परिपत्रकाद्वारे गॅस वितरणाविषयी एक नियमावली जारी केली आहे. त्यानुसार, रुग्णालये, शैक्षणिक संस्था व सार्वजनिक सेवांना १०० टक्के गॅस पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आलेत. तर इतर संस्था व विभागांना ७० ते ५० टक्के गॅस पुरवठा करण्याचे आदेश सरकारने दिलेत.


राज्याचे सहसचिव अशोक आत्राम यांनी या परिपत्रकाद्वारे राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना उद्देशून म्हटले आहे की, आपल्या जिल्ह्यातील शासकिय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, वसतिगृहे, शासकीय खानावळ, मध्यान्ह भोजन योजना, अंगणवाडी, शैक्षणिक संस्थांतर्गत चालवण्यात येणाऱ्या खानावळी इत्यादींना एलपीजी गॅस सिलिंडरच्या १०० टक्के वाटपाबाबतची कार्यवाही करण्यात यावी आणि त्याबाबतचा अहवाल शासनास दररोज सादर करण्यात यावा.

### कोणत्या क्षेत्राला किती मिळणार गॅस?

सरकारच्या निर्देशांनुसार, रुग्णालये, शैक्षणिक संस्था व सार्वजनिक सेवांना १०० टक्के गॅस पुरवण्यात येईल. स्मशानभूमी, वृद्धाश्रम व अनाथाश्रमांनाही १०० टक्के गॅस पुरवठा करण्यात येईल. तर उपहारगृहे, संरक्षण क्षेत्र, शासकीय व सार्वजनिक क्षेत्र, रेल्वे, हवाई वाहतूक, पोलिस/तुरुंग यांना ७० टक्के गॅसचा पुरवठा केला जाईल. याशिवाय महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, औषध उद्योग, बीज प्रक्रिया व मत्स्यपालन क्षेत्राला ५० टक्के गॅस पुरवठा करण्याची मर्यादा सरकारने आखून दिली आहे.

## वरिष्ठांशी बोलूनच सेनेला सभापतीपद : खा.मोहिते-पाटील

✔ सोलापूर/प्रतिनिधी



माळशिरस पंचायत समितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बहुमत असूनही मोहिते पाटील यांनी सभापतिपद हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला दिले आहे. त्याची चर्चा जिल्ह्यात जोरदारपणे सुरू आहे. खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी त्यावर उत्तर देऊन चर्चे वर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. वरिष्ठांशी नेत्यांशी बोलूनच शिंदे सेनेला सभापतीपद दिल्याचे खा. मोहिते-पाटील यांनी सांगितले.

खासदार धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले, माळशिरसमधील जनतेने दोन्ही राष्ट्रवादी आणि शिवसेनेला कौल दिला होता. या युतीच्या माध्यमातून एकनाथ शिंदे गटाला सभापतिपद आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाकडे उपसभापतिपद घेतले आहे. तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने आम्ही एकत्रितपणे काम करत आहोत. आमचे आजोबा स्व. शंकरराव मोहिते पाटील यांचे सहकारी नानासाहेब मगर यांना मागे एकदा उपसभापती करण्याची संधी आली होती. मात्र, दुसऱ्या कार्यकर्त्याला संधी द्यायची म्हणून त्यांनी आपणहून स्वतः मागे राहून त्या कार्यकर्त्याला उपसभापती होण्याचा मान दिला होता. नानासाहेब मगर यांच्याच घरातील एका मुलाला आता आम्ही सभापती केले आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने नानासाहेब मगर यांना श्रद्धांजली वाहिलेली आहे, अशी भावना खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी बोलून दाखवली. ते म्हणाले, सभापती दत्तात्रेय मगर आणि उपसभापती मनिषा पाटील हे दोघंही नवीन आणि तरुण आहेत. आजपर्यंतच्या सभापती आणि उपसभातींनी माळशिरस तालुक्याचे नाव उंचावण्याचे काम केले आहे. त्याचपद्धतीने कामकाज या दोघांकडून अपेक्षित आहे. यावर्षी दुष्काळाची स्थिती राहील, असे सांगितलं जात आहे, त्यामुळे त्यांनी आतापासूनच सर्व सदस्यांना विश्वासात घेऊन नव्या पदाधिकाऱ्यांनी पाणी टंचाईच्या संदर्भात नियोजन करावं, अशी माझी त्यांना सूचना राहील. आमची युती ही निवडणुकीपूर्वीची आहे. नगरपालिका निवडणुकीपासून दोन्ही पक्षाच्या वरिष्ठांशी नेत्यांशी बोलून त्यांच्या परवानग्या घेऊनच शरद पवार गट आणि एकनाथ शिंदे गट एकत्र काम करत आहेत, तालुक्याचा विकास आपल्याला करायचा असून पक्षाच्या वरिष्ठांशी सल्लामसलत करूनच सगळ्या गोष्टी पुढे नेल्या जातील, असेही धैर्यशील मोहिते पाटील यांनी सांगितले.

**सोलापूर शहराचे तापमान**

कमाल तापमान ४०.०

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आजही ते रिकाम्या हातानेच परतले !

**कल्याण**

**357-54-248**

## 'एलपीजी'ला 'डीएमई'चा पर्याय सापडला!

### पुण्यातील शास्त्रज्ञांचा दावा, २० वर्षांच्या संशोधनाला यश!

✔ पुणे/प्रतिनिधी

अमेरिका-इस्रायल-इराण यांच्यातील युद्धाचा थेट फटका जागतिक अर्थव्यवस्थेला बसत असून युद्धामुळे जगभरात आणि विशेषतः भारतात एलपीजी गॅसची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. याचा फटका हॉटेल्स आणि कारखान्यांसोबतच शाळांसारख्या महत्त्वाच्या शैक्षणिक संस्थांनाही बसत आहे. एकीकडे एलपीजी गॅसच्या तुटवड्यामुळे संपूर्ण जग हैराण झालेलं असताना पुण्याच्या नॅशनल केमिकल लॅबोरेटरी मधील शास्त्रज्ञांना एलपीजी ला पर्याय ठरू शकेल अशा डायमिथाईल इथर 'डीएमई' गॅसची निर्मिती करण्यात यश आलं आहे.




**'एलपीजी'मध्ये आठ टक्के मिसळता येणार 'डीएमई' गॅस**

नॅशनल केमिकल लॅबोरेटरी मधील शास्त्रज्ञ डॉ. तिरुमलाईवामी राजा आणि त्यांच्या टीमने वीस वर्ष संशोधन करून हा गॅस तयार करण्यासाठी लागणारे उत्प्रेरक प्रयोगशाळेत तयार करण्यात यश मिळवलं आहे. या उत्प्रेरकापासुन तयार झालेल्या डीएमई गॅसचा व्यावसायिक वापरासाठी उत्पादन करण्यात देखील यश आलं असून सध्या पायलट प्रोजेक्टमधे दररोज अडीचशे किलोच्या प्रमाणात तो तयार होत आहे. औद्योगिक कंपन्यांसोबत करार करुन या गॅसच मोठ्या प्रमाणात उत्पादन झाल्यास हा गॅस एलपीजीमध्ये आठ टक्के इतक्या प्रमाणात मिसळता येणार आहे. त्यामुळे इंधनासाठी इतर देशांवर असलेलं अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार आहे.

### ...तर 'एलपीजी'वरील अवलंबित्व होणार कमी

मोठ्या प्रमाणात उत्पादन झाल्यास या गॅसची किंमत एलपीजीपेक्षा कमी असेल असा विश्वास शास्त्रज्ञांनी व्यक्त केला आहे. पुण्यामधील शास्त्रज्ञांनी हे संशोधन केलं आहे. डायमिथाईल इथर अर्थात डीएमई गॅस भारतीय बनावटीच्या उत्प्रेरकापासून तयार करण्यात शास्त्रज्ञांना यश आलं आहे. एलपीजीपेक्षा हा गॅस शुद्ध असल्याने या गॅसची फ्लेम पारदर्शक असते ज्यामुळे हा गॅस पर्यावरणपूरक ठरतो. हा गॅस स्वतंत्र देखील वापरता येतो आणि एलपीजीमध्ये आठ टक्के मिसळून देखील त्याचा वापर करता येतो. डीएमई गॅसमुळे एलपीजीवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होईल. मोठ्या प्रमाणात उत्पादन झाल्यास या गॅसची किंमत एलपीजी पेक्षा कमी असेल.

### भारतात दरवर्षी किती एलपीजी वापरला जातो?

अहवालांनुसार, भारत दरवर्षी अंदाजे ३१.३ दशलक्ष टन द्रवीभूत पेट्रोलियम गॅस (एलपीजी) वापरतो. या एकूण गरजांपैकी सुमारे ८७ टक्के घरगुती स्वयंपाकात वापरला जातो. सर्वात मोठी चिंता अशी आहे की भारताच्या एकूण एलपीजी गरजांपैकी ६२ टक्के आयात केली जाते आणि या आयातीपैकी ८५-९० टक्के होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाते. अमेरिका-इराण युद्धामुळे हा मार्ग सध्या बंद आहे. सौदी अरेबियासारख्या देशांमधून एलपीजी टँकर या मार्गाने भारतात पोहोचत असत.